PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 4, ISSUE 4

# कृपा आणि कर्म एका नाण्याच्या दोन बाजू

**वळवी विश्वास गोरखनाथ**
संशोधक विध्यार्थी
सामाजिक शास्त्रे प्रशाळा, इतिहास विभाग,
कबचौउमवि,जळगाव,
**( महाराष्ट्र ) भारत**

***'जेथे प्रार्थना हि स्वार्थासाठी,पवित्र वचन स्वतःच्या कल्याणासाठी,सुवार्ता हि स्वतःस मिरविण्यासाठी,पदाचा वापर हा स्वतःच्या अहंपणासाठी,ख्रिस्ताचे नाव स्वतः उंच होण्यासाठी इत्यादी गोष्टीसाठी आध्यात्मिक घटकांचा वापर केला जातो,त्याला कर्मकांडाचे अतिक्रमण असे म्हटल जाते.''***

## १) प्रस्तावना:

कर्म आणि कृपा या एका नाण्याच्या दोन बाजू आहेत.ख्रिस्ती धर्माच्या धर्मग्रंथ पवित्रबायबल यात म्हटलेले आहे ***''विश्वास हा कृत्यावाचून मृत आहे''*** आणि तसेच ''***विश्वासावाचून देवाला संतोषविणे अशक्य आहे***.'' म्हणजे धार्मिकतेचे कार्य करण्यासाठी फक्त विश्वासाचे बोल न बोलता विश्वासाला कृत्यातून दर्शविणे गरजेचे आहे कर्म करणे गरजेचे आहे पण ते कर्म देखील विश्वासाने पाहिजे नाहीतर विश्वासावाचून केलेले कृत्य हि पाप आहे.तर मग कर्म करावे कसे? तर कोणते कर्म देव मान्य करणार? आणि कोणते नाही? हे मोठे आणि गहन प्रश्न आहे.त्यामुळेच पवित्रशास्त्राच्या आधार घ्यावा लागतो कि कर्म मोठे आहे कि कृपा? कारण मनुष्य पापी असतांना ख्रिस्ती आपणासाठी मरण पावला.ख्रिस्ताला क्रुसावर टांगले तरी त्याने लोकांना क्षमा केले.पापाचे वेतन हे सर्वकालीन मरण होते.पण देवाने ख्रिस्तामध्ये सर्व मानवजातीला कृपा पुरविली आणि अनंतजीवनाचे मार्ग मोकळे केले.कृपा हि प्रथम आणि पण कृपेचा मोबदला प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीला पवित्र आत्म्याच्या आणि पवित्रशास्त्राचा मार्गदर्शनाखाली देवाच्या कार्याचे कर्म करून देवाच्या महिमेसाठी उभे राहावे लागणार.म्हणून कृपा आणि कर्म हि एका नाण्याच्या दोन बाजू आहे.


VOL 4, ISSUE 4 www.puneresearch.com/world DEC 19 - FEB 2020
(IMPACT FACTOR 3.02) INDEXED, PEER-REVIEWED / REFEREED INTERNATIONAL JOURNAL

## २) **कृपा श्रेष्ट आहे पण कर्म देवाच्या महिमेसाठी करणे अगत्याचे आहे**:-

कर्म आणि कृपा या दोहोंमध्ये खूपच मोठी दरी आहे.देवाच्या कृपेच्या कोणताच मोल आपण कर्मात तोलू शकत नाही.एक ख्रिस्ती व्यक्ती कितीही कर्माचे साचे भरून ठेवेल तरीही कृपाच त्याला अंतिम तारणाकडे आणि सत्याकडे घेऊन जाईल.कारण **"कृपा व सत्य यांचा मिलाप झाला आहे.नीती व शांती ह्यांनी एकमेकींचे चुंबन घेतले आहे"** जो व्यक्ती सत्यात चालतो तोच कृपेच्या लायकीचा आहे त्याच्याच जीवनात कृपेच्या सूर्य उदय होऊन तो वाढत जातो.असत्य जीवन आणि अदेखाई मनुष्यापासून कृपा ही दूर पडते,कारण अशी माणसे फक्त कर्मावर विश्वास ठेवून देवाच्या महिमेला तुच्छ जाणता. पण सत्य काय आहे तर देवाचे वचन सत्य आहे आणि त्या वचनाप्रमाणे जो मनुष्य वागतो आणि चालतो त्याला नवीन बळ प्राप्त होते,कृपा त्याला तारणाचा राजपथावरील मार्गात चालविते.कर्म आणि कृपा या नाण्याच्या दोन बाजू असून विरुद्ध नाही,कारण देवाची सत्कृत्ये करण्यासाठी देव त्याची कृपा आपल्यांना पुरविते.पण जर हि सत्कृत्ये फक्त भौतिक आणि दृशगोष्टीपूर्ती मर्यादित असली आणि देवाच्या महिमेसंबंधी तिच्या काडीमात्र संबंध येत नसेल तर ती फक्त कर्माची वाजणारी थाळी आणि झांझ बनते.त्यामुळे देवाची सत्कृत्ये करण्याअगोदर त्यात देवाची इच्छा आणि हेतू हा स्पष्ठ दिसायला हवा.नाहीतर तारण अविश्वासामुळे निष्फळ होऊ बसेल.आणि म्हणून प्रश्न निर्माण होत असतो,तुम्ही तारणासाठी कशावर सर्वात जास्त अवलंबून आहे कर्मावर कि कृपेवर.

**पैमेला फिब्रॉन** म्हणतात '*'**कृपा म्हणजे दयेस अपात्र असलेल्या व्यक्तीवर कृपा करणे"***कृपा ही अशा व्यक्तीवर केली जाते जो दयेस अपात्र आणि नालायक आहे म्हणजे कृपेच्या लायक नसलेला.अपात्र व्यक्ती तारणापासून वंचित होऊ नये,म्हणून परमेश्वराने आपल्या एकुलत्या एक पुत्राद्वारे तारणाचा मार्ग खुला केला.पुष्कळदा अनेक लोकांचे कृपेद्वारा तारण होते तरी एकाद्या लहानशा चुकीमुळे ते पुन्हा त्यांच्या जुन्या कल्पनेकडे वळून आपले तारण अबाधित ठेवण्यासाठी कार्य करण्याची धडपड करू लागतात .आजच्या भरपूर मंडळ्यासुद्धा या पाखंडी मताने बिघडलेल्या आहेत.आणि कर्मावर जास्त भर देतांना दिसतात.कर्मकांडाचे ज्या वेळी स्तोम माजते त्यावेळी आधात्मिक प्रबोधन परमेश्वर घडवून आणतो.आज भरपूर मंडळींना हे माहितच नाही कि आपण कुठेतरी कर्माचे अतिक्रमण करीत आहोत आणि कृपेपासून दूर सारले जात आहोत.

## ***३) कर्मकांडाचे अतिक्रमण म्हणजे काय?***

'*विल्यम मैक्डोनाल्ड* आपल्या **देवाची अद्भुत कृपा** या पुस्तकात म्हणतात ***''ती कृपा नव्हे कृपा आणि कर्म हे दोन्ही एकमेकांच्या विरुद्ध आहेत.ज्या क्षणी त्या दोहोंना एकत्र करण्याच्या प्रयत्न करतो तेथे कृपा उरतच नाही.उदारणार्थ,आंम्ही ख्रिस्ती जीवन जगल्याने तरणप्राप्ती झाली असे म्हणणे म्हणजे ती कृपा नव्हे.आमच्या या कृत्यांद्वारे आम्हाला तारण मिळाले असे म्हणणे कि,विश्वास***

***आणि कृत्ये यामुळे तारणप्राप्ती झाली तर ती सुद्धा कृपा नव्हे,कृपा हे बजावून सांगते कि,हे विश्वासाने कृपेद्वारेच व इतर कशानेही नाही.***''एका मनुष्याला जेव्हा देवाची कृपा काय आहे समजते तेव्हा त्याची काय प्रतिक्रिया असते यांचे सुंदर वर्णन ***जॉन न्यूटन*** यांनी आपल्या *अदभुत कृपा* या कवितेत केलेले आहे

> ***"अदभुत कृपा,किती मधुर नाद मज भ्रष्ट तारीले,***
>
> ***हरवलेला मी,आता सापडलो गेले अंधत्व पाहतो.***
>
> ***कृपेनेच शिकवले या हृदयाला भय,कृपेनेच भय दुरही केले.***
>
> ***मौल्यवान किती कृपाही भासली,विश्वासण्याच्या क्षणी हो मला.***
>
> ***संकटे,परिश्रम ,आमिषामधून मी आलो येथवरी कृपेनेच आणिले.***
>
> ***मज येथवरी,कृपाच नेईल घरी,***
>
> ***तेथे असू आपण हजारो वर्षे प्रकाशत,***
>
> ***सूर्यासमान गौरव देवाचे गातच राहू,या आरंभील्या क्षणापासून.''***

देवाची कृपा तारण मिळवून देते जेव्हा एका व्यक्तीला हे समजते की **मी पापी असतांनाच ख्रिस्त माझ्या पापासाठी मरण पावला** तेव्हा त्याला कृपा आणि कर्म यांच्या खरा भेद समजतो.आणि तारण हे कृपेनेच प्राप्त होते,कर्माचा त्याच्यात जवळूनही काही संबंध नाही.**तारण स्वीकारण्याची मनुष्यावर जबरी नाही**.तारण ही एक स्व:इच्छा आहे,आणि जो मनुष्य देवाच्या कृपेला प्रतिसाद देतो त्याला ती प्राप्त होते,अन्यथा आज संपूर्ण जग देवाची महिमा करीतांना दिसले असते,पण देव न्यायी देव आहे त्याच्या योजना अथांग आणि सत्य आहे.देवाचे वचन सांगते ****"जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याच्या नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे''***तारणासाठी सर्वात पहिली अट विश्वास आहे,हे विश्वासाचे तत्व बळजबरीने दिले जात नाही,*विश्वास तो डोळा आहे जो तारणाचा मार्ग प्रशस्थ करतो,*आणि तारणाच्या मार्गावर येणाऱ्या प्रत्येक अडथळ्याना तो दूर सारत जातो.

## ***४) विल्यम मैकडोनाल्ड तारणासाठी सात आवश्यक बाबी सांगतात:-***

१) **तारण सर्वांसाठी असावे:-** एकही व्यक्ती त्याच्यापासू वंचित राहु नये असे परमेश्वराला वाटते,आणि म्हणून ख्रिस्ताने सर्व मानवजातीसाठी तारणाचे द्वार उघडे केले.

२) **सर्वांना पुरेसे असावे:-** काही ही अपवाद करावा न लागता त्याला सर्वांच्या गरज पुरवता येतात.तारण हे परिपूर्ण दिले जाते त्यात कमतरता राहत नाही.

३) **असे काही ज्यासाठी प्रत्येकजण पात्र असेल:-** तारणात सहभागी होण्यापासून कोणालाही कोणत्याही दृष्टतेच्या अडथळा अथवा अपंगत्वाच्या अटी रोखू शकत नाही.

४) **असे काही जे कोणालाही मिळू शकेल:-** खऱ्या धर्मात अशा कोणत्याच अटी नसाव्यात ज्या काहींना पूर्ण करता येणार नाही.ख्रिस्ती धर्म विश्वास,आशा आणि प्रेम या तत्वावर आधारलेला असून त्यावर कोणालाही सहज चालता येते फ़क्त त्याने ख्रिस्ताला प्रभू म्हणून स्वीकारावे.

५) **मानवाला बढाई मारता येईल अशी कोणतीच शक्यता त्यात नासावी:-**हे खूप मोठे वाक्य आहे कारण तारण हे कर्मानि नव्हे तर कृपेने प्राप्त होते, जर कर्म पुरेसे असते तर मनुष्याला गर्व निर्माण होण्याचे कारण झाले असते.गर्वातून व बढाईद्वारेच पाप निर्माण होते आणि स्वर्गात बढाई किंवा गर्व नसणार आहे,त्या गर्वाला दूर ठेवण्यासाठी सर्वांची स्वर्गात जाण्यासाठी समान पात्रता असायला हवी.

६) **कोणालाही सहज समजेल असे ते असावे**:-जे अनाकलनीय आहे असे काही देऊ करण्यात काहीच अर्थ नाही.म्हणून देवाचे तारण हे स्पष्ट केलेले आहे,देवाचे वचन आणि पवित्र आत्मा,हे तारणाचे संपूर्ण मार्गदर्शन करते.

७) **तारण हे कोणाच्या इच्छेविरुद्ध नसावे:-**तारण ही स्व:इच्छा आहे,त्यासाठी कोणावरही जबर नाही,तारणासाठी देवाचा विश्वास,पवित्रशास्त्र आणि पवित्र आत्म्याचे मार्गदर्शन या महत्वपूर्ण गोष्टी दिलेल्या आहे.

## ५) निष्कर्ष:-

तारण हे देवाच्या कृपेनेच शक्य आहे त्यासाठी जप,ताप,कर्माचे अवंडर चालत नाही,देवाच्या इच्छेवर ते अवलंबून आहे.कारण जो ख्रिस्ती मनुष्य देवाच्या इच्छेप्रमाणे जीवन-यापन करतो कृपा रोज त्याचे चुम्बन घेते,सत्य आणि पवित्र जीवन त्याच्या जीवनाचे प्रमुख अस्त्र असतात.तो तारणासाठी आपली लायकी सिद्ध करतो.खरे पाहता तारण हे संपूर्ण देवावर आणि त्याच्या कृपेवर अवलंबून आहे.कोणी मनुष्य त्याला जाब विचारू शकत नाही.कोणी मनुष्य त्याला कर्मसिद्धांत शिकवू शकत नाही.देवाच्या  तारणाचे निकष तो त्याच्या प्रियजनास नेहेमी प्रकट करत जात असतो.त्यामुळे संपूर्णपणे देवावर अवलंबून राहूनच आपण त्याची सर्वोच कृपा प्राप्त करू शकतो.त्यासाठी कर्माच्या वाटेवर स्वत:ला मिरविण्याची गरज नाही. **जॉन मैकआर्थेर** म्हणतात *"कृपा हे तारण देणारे देवाचे अद्भुत दान आहे आणि ज्यांना तो कृपेद्वारे तारितो त्यांच्यावर शांती या अदभूत आशीर्वादाचा वर्षाव करतो.याच कारणास्तव कृपा व शांती हा वाक्यांश पहिल्या ख्रिस्ती लोकांमध्ये अभिवादनासाठी वापरण्यात येऊ लागला."* देवाच्या कृपेच्या जेव्हा योग्य वापर होतो तेव्हा आमचे केलेले प्रत्येक कृत्य हे देवाच्या महिमेसाठी उत्पन्न होते आणि आम्ही चिरकालीन देवाच्या राज्याच्या शांतीसाठी लायक बनतो

## संदर्भग्रंथसूची:-

१) पवित्रशास्त्र,नवा करार,इब्रीकरास पत्र,११-६.
२) पवित्रशास्त्र,जुना करार,स्रोतसंहिता:-८५-१०.
३) तुमच्या भविष्यकाळाचा विचार करा, विलियम मैक्डोनाल्ड, ओथेन्तिक प्रकाशन, प्रथमावृत्ती २०१४, सिकंदराबाद.
४) पवित्रशास्त्र, नवा करार, योहान ३:१६
५) पौलाचे तीताला पत्र,मैकआर्थेर भाष्यग्रंथ,ग्रेस टू इंडिया,२००८,पुणे
६) पाळकांमध्ये काय पाहावे, ब्रायन बीळबाक, लव्ह महाराष्ट्र, प्रथमावृत्ती २०१०, पुणे.
७) खऱ्या परिवर्तनाची सात लक्षणे, पीटर मास्टर्स, जी एल एस प्रकाशन, प्रथमावृत्ती २०१७, मुंबई.